अपर पोलीस आयुक्त
पूर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर यांचे कार्यालय
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पुणे स्टेशन जवळ, पुणे ४११ ००१
संपर्क क्र. ०२० - २६११४६०४
email - addlcpnorth.pune@nic.in

जा. क्र.अपोआ/वाचक-२/३६५९/२०२४, पुणे शहर | दिनांक :-२४/०८/२०२४

# प्रेसनोट

पुणे शहरातील नागरिकांची वाहतूक कोंडीतून सुटका व वाहतूकीचा वेळ कमी करण्यासाठी शहरातील वाहतूक वाहिन्या असलेल्या मुख्य ३२ रस्त्यांवर चौक सुधारणा, पार्कीग मॅनेजमेंट, वाहतूक नियंत्रण साधने, वाहतूक विलगीकरण टेक्निक्स इ. माध्यमातून अभिनव योजना राबविण्यात येत आहे. वाहतूक शाखा व पुणे महानगरपालिका यांचे समन्वयातून ट्रॅव्हल टाईम कमी करणे तसेच पुणे शहरातील रस्त्यांची कॅरींग कॅपेसिटी वाढविण्यात येत आहे.

मा.पोलीस आयुक्त पुणे शहर व अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली पुणे शहरामध्ये रस्त्यांचे त्यांचे उपयोगानुसार वर्गीकरण करून त्यावर रस्त्याबाबत काम करणा-या इतर स्थानिक प्राधिकरणांचे मदतीने विशेष उपाययोजना करण्याचा प्रोजेक्ट दि.१६/०८/२०२४ रोजीपासून सुरू करण्यात आलेला आहे.

शहरातील मुख्य रस्त्यांवर वाहतूक नियमन करण्यासाठी तसेच मुख्य रस्त्यांवरील वाहतूकीस अडथळा आणणा-या आस्थापना व वाहतूकीचे नियमांचे उल्लंघन करणारे वाहनांवर वाहतूक शाखेकडून विशेष कारवाई करण्यात येत आहे. त्यामध्ये दि.१६/०८/२०२४ ते दि.२१/०८/२०२४ या कालावधीत मुख्य ३२ रस्त्यांवर (१) टेम्पो कारवाई-२४१२, (२) क्रेन कारवाई-६०७, (३) हॉकर्सवर कारवाई-२५१, (४) आस्थापनांना नोटीस देणे-१५६, (५) आस्थापनेवर भारतीय न्याय संहिता क.२८५ प्रमाणे गुन्हे दाखल- ०१, (६) रॉंग टर्न- ३१, (७) रॉंग साईड-२९९, (८) लोड/अनलोड वाहने-२, (९) सिग्नल जंपींग-१०३२, (१०) लेन चेंज अॅट सिग्नल-३, (११) जड वाहनावरील कारवाई-१२३, (१२) फुटपाथ वरील कारवाई-९२, असे सर्व मिळून एकूण ५००९ कारवाई करण्यात आली आहे.

त्याचबरोबर विशेष मोहिमे दरम्यान दि.०१/०८/२०२४ ते दि.२२/०८/२०२४ या कालावधीमध्ये वाहतूक शाखेकडून पुणे शहरामध्ये (१) रॅश ड्रायव्हींग- ६३६, (२) रॉंग साईड- २३९८, (३) अल्पवयीन चालक- ४, (४) सिग्नल जंपींग- ३९१९, (५) ट्रिपल सीट- २२१२, (६) मोबाईल वापर- १३१४, (७) फॅन्सी नंबरप्लेट- १३०४, (८) ड्रंक अॅन्ड ड्राईव्ह- २०३, (९) लेन कटींग सिग्नल- २६, (१०) फुटपाथ- ४६९ अशा एकूण १२४८५ बेशिस्त व वाहतूकीचे नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली आहे.

वरील प्रमाणे दि.०१/०८/२०२४ ते दि.२२/०८/२०२४ या कालावधीमध्ये वाहतूकीचे नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकांकडून एकूण ८६,८२,५००/- रू. दंड वसूल करण्यात आलेला आहे.

( मनोज पाटील )
अपर पोलीस आयुक्त,
पूर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर

प्रत:- सर्व संबंधीतांना